नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०३/२०२५ (रविवार) संध्याकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद. आरोपी अटक, भिवापुर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :—दिनांक २२/०३/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती मिळाली की, अवैधरित्या जानावरांची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पेट्रोलींग केली असता मौजा वाडा ढाब्याजवळ संशयीत वाहन बोलोरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच ३६ ए.ए .०४३० या वाहनास थांबवुन वाहन चेक केले वाहना मध्ये डाल्यात ०४ काळया रंगाचे हेले मिळुन आले दृ सदर जनावारांना निर्दयतेने, क्रुरतेने चारापाणी न देता , कमी जागेत कोंबुन गाडीत ठेवले होते. आरोपी चालक **शैलेश रमेश जांभुळकर, वय २५ वर्षे, रा.कोंढा ता. पवनी, जि. भंडारा याच्या ताब्यातुन ०४ काळया रंगाचे हेले प्रत्येकी ३०,०००/—रूपये प्रमाणे १,२०,०० /—रूपये आणि बोलोरो पिकअप वाहन क्र एम.एच ३६ ए.ए. ०४३० किंमती ४,००,००० /—रूपये असा एकुण ५,२०,०००/—रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

आरोपी **शैलेश रमेश जांभुळकर, वय २५ वर्षे, रा. कोंढा ता. पवनी, जि. भंडारा** याचे विरूध्द .पशु संरक्षण अधिनियम ,महा.पोलीस अधिनियम अन्वये ,मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे**

पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर